

रत्नागिरी : मान्यवरांचा गौरव करताना अधिकारी.

# रत्नागिरी विशेष कारागृहात प्लम्बिंग प्रशिक्षण सुरू

**रत्नागिरी : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र कारागृह विभागाचे अपर पोलिस महासंचालक व महानिरीक्षक डॉ. सुहास वारके तसेच विशेष कारागृह महानिरीक्षक तथा कारागृह उपमहानिरीक्षक योगेश देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली रत्नागिरी विशेष कारागृहात बंदी बांधवांसाठी कौशल्य विकास कार्यक्रमांतर्गत प्लम्बिंग कोर्स प्रशिक्षणाचा शुभारंभ करण्यात आला. मुकुल माधव फाउंडेशन, पुणे यांच्या सहकार्याने जन शिक्षण संस्थान, रत्नागिरी व आयटीआय, रत्नागिरी यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित या प्रशिक्षण कार्यक्रमाचा प्रारंभ सोमवारी करण्यात आला.

कारागृहातून मुक्त झाल्यानंतर बंदी बांधवांचा सर्वांगीण विकास व्हावा, त्यांना रोजगाराच्या संधी उपलब्ध व्हाव्यात तसेच समाजात स्वाभिमानाने आणि सन्मानाने जीवन जगता यावे, या उद्देशाने या प्रशिक्षणाचे आयोजन करण्यात आले आहे.

कार्यक्रमास फिनोलेक्स उद्योग समूहाचे दत्त अलबुर (प्रेसिडेंट ऑपरेशन्स), नंदकिशोर शिंपी (प्लांट एचआर हेड), सागर चिवटे (फॅक्टरी मॅनेजर), आशीष आठवले (सीनियर ऑफिसर), शामराव निंबाळकर (सीएसआर), वरद गोरे, जन शिक्षण संस्थानच्या संचालिका निधी सावंत तसेच आयटीआय, रत्नागिरीचे नाटेकर उपस्थित होते. यावेळी मान्यवरांनी बंदी बांधवांना कौशल्य विकासाचे महत्त्व पटवून देत मोलाचे मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाच्या शेवटी रत्नागिरी विशेष कारागृहाचे अधीक्षक सचिन पाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी कारागृह अधिकारी अनिकेत गोरवाडकर (तु.अ. श्रेणी-२) तसेच कर्मचारी किशोरसिंग परदेशी, हनुमंत माने, गणेश चोपडे आणि समद सैयद यांनी विशेष परिश्रम घेतले.